मासिकांक १६

दिनांक: २९ ऑगस्ट २०२२

# "ती"चं पान

तिच्याकडून सगळ्यांसाठी

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे



# श्रेय नामावली

| | |
|---|---|
| प्रबंध संचालिका व संपादक | सौ. सायली अक्षय देशपांडे |
| अतिथी संपादक व मार्गदर्शिका | सौ. शुभा साठे |
| मुखपृष्ठ, अंक मांडणी व सजावट | अक्षय देशपांडे |
| टीम “ती”चं पान | तृष्णा आंबेकर<br>अपूर्वा भालेराव<br>रेणुका देशपांडे<br>दिशा टिकेकर<br>मृण्मयी सारंग<br>भार्गवी बाबरेकर<br>निर्मिती देवलसी<br>संजीवनी मराठे<br>स्वर्णिमा प्रकाश<br>प्राजक्ता बर्वे |
| सर्व चित्रे (मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ) | www.freepik.com वरून साभार |

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | ४ |
| २. | दोन शब्द | ६ |
| ३. | स्वातंत्र्य देवीस शरण | १० |
| ४. | नारी तू नारायण | १४ |
| ५. | अमृत महोत्सवी सोहळा | १७ |
| ६. | दीपशिखा | २१ |
| ७. | अमृतकाळ | २५ |
| ८. | भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचे योगदान | २८ |
| ९. | “ती”चा संग्राम | ३२ |
| १०. | बा स्वातंत्र्या | ३४ |
| ११. | भारतीय स्वातंत्र्य चिरायू रहो!! | ३७ |
| १२. | स्वातंत्र्य चळवळीतील धगधगती मशाल- प्रितीलता वड्डेदार! | ४० |


"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी


www.tichapaan.com

tichapaan@gmail.com

Facebook Page

७३७८४९९९७७


टीप:

या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखनातील मतांशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

# प्रस्तावना

- सायली अक्षय देशपांडे

रसिक वाचकहो नमस्कार..! “ती” चं पान चा १६ वा ई मासिकांक आपल्यासमोर ठेवतांना अत्यंत आनंद होतोय. नवीन विषय नवीन संकल्पना यांना समोर ठेवत या अंकाचा आजपर्यंत सुरु असलेला अविरत प्रवास मनाला प्रत्येकवेळी एक नवीन उभारी देवून जातो. या महिन्याच्या अंकात असलेला विषय हा “स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव” या संकल्पनेला मध्यवर्ती ठेवून लिहिलेला आहे.

ज्या देशात आपण जन्माला त्या देशाला ७६ व्या वर्षात पदार्पण करत असतांना बघून ऊर अभिमानाने भरून येतो. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात ज्यांनी ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली त्यांचं हौतात्म्य हे नक्कीच प्रेरणादायी आहे.आतापर्यंत इतिहासाच्या पुस्तकापुरतं हे सगळं मर्यादित होतं. पण जेव्हा आपण काही लिहिण्यासाठी इतिहासात डोकावतो तेव्हा आपलं खुजेपण आपल्याला सहज जाणवतं आणि आपण नतमस्तक होतो.

या मासिकांकात ज्यांनी ज्यांनी लिहिलंय त्यात “त्याच्या” पराक्रमाइतकंच “ती” चं सुद्धा तितकंच योगदान आहे. त्याला उजाळा देण्यासाठी या अंकात “ती” ला मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ती कुठे नव्हती? अगदी स्वातंत्र्य लढ्यापासून शैक्षणिक चळवळीपर्यंत तिचं कार्य हे बहुमोलाचं  आहे. आणि म्हणूनच हा अंक तिला आणि तिच्या कार्याला समर्पित..

या अंकात दोन शब्द लिहिणाऱ्या श्री. प्रसाद देशपांडे यांचे विशेष आभार. देशाचा अमृतमहोत्सव म्हणजे नेमकं काय आणि आपल्या मनात असणाऱ्या बहुतेक सगळ्याच शंकांचं निरसन त्यांनी आपल्या परखड आणि सर्वांगसुंदर लेखणीने केले याचा विशेष आनंद आहे. आमच्यासारख्या तरुण पिढीला समजेल आणि उमजेल अशा खास शैलीत त्यांनी आपले विचार  या ठिकाणी व्यक्त केले आहेत.

या अंकात समाविष्ट असलेलं सगळं लिखाण हे प्रत्येक लेखाप्रमाणेच वेगवेगळ्या पैलूंनी त्यात असलेल्या विचारांनी अधिक सुंदर झालंय त्याचं संपूर्ण श्रेय सगळ्या ती च्या लिहित्या हातांना आहे.

या संपूर्ण अंकाला खुलवणारे श्री. अक्षय देशपांडे यांच्या सर्जनशीलतेसाठी त्यांचे सुद्धा विशेष आभार. असाच प्रत्येक अंक मुखपृष्ठापासून मलपृष्ठापर्यंत कायम नयनरम्य असावा या आशेसह माझ्या लेखणीला विराम देते.

या अनोख्या अमृतमहोत्सवाच्या लेखन प्रवासात तुम्ही सुद्धा सहभागी व्हा. आणि ती ला प्रोत्साहन द्या..! समस्त वाचकांना पुनश्च "अमृतमहोत्सवाच्या मन:पूर्वक शुभेच्छा"

जय हिंद! जय भारत! भारत माता की जय..!!!

# दोन शब्द

- श्री. प्रसाद देशपांडे

गेल्या ७५ वर्षांच्या स्वातंत्र्याच्या कालखंडात भारताने काय कमावलं?? भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा आणि मिळालेल्या स्वातंत्र्याचा गाभा काय आहे?? नेमकं स्वतंत्र देश होऊन भारताने काय मिळवलं आहे?? अशी एक ना अनेक प्रश्न गेल्या काही वर्षांपासून, नेमकं सांगायचं तर गेल्या ८ वर्षांपासून भारतातल्या काही विशिष्ट वर्गाला पडली आहेत!! गंमत म्हणजे हे सगळे प्रश्न त्यांना बरोब्बर १५ ऑगस्ट किंवा २६ जानेवारीला पडतात!! असो, त्यांना काय प्रपोगंडा चालवायचा आहे तो चालवु देत, पण खरंच गेल्या ७५ वर्षांत आपण एक देश म्हणुन किंवा देशाचे नागरिक म्हणुन नेमकं काय कमावलं आहे?? आजवर आपण पोहचलो तिथे पोहचणं भारतासारख्या देशासाठी नेमकं काय होतं?? आपण खरंच ह्याचा कधी विचार केलाय का??

ब्रिटिशांनी १५० वर्षांच्या काळात जवळजवळ ४५ ट्रिलियन डॉलर्स भारताकडून लुटून नेले!! १९४७ साली स्वातंत्र्य देतांना अक्षरश: ओरबाडून गलितगात्र झालेला देश भारतीय नागरिकांसाठी सोडून ब्रिटीश निघुन गेले!! आज तोच भारत ७५ वर्षांनंतर सहाव्या क्रमांकाची जगातली सगळ्यात मोठी अर्थव्यवस्था आहे. जगातील जीडीपीत भारताचं योगदान ३.२८% आहे. आज आपण जगाची फार्मा कॅपिटल आहोत, जगातल्या २०० देशांना आपण विविध औषधं, लसी ह्यांचा पुरवठा करतो, मेक इन इंडिया योजनेअंतर्गत आपण संरक्षण, स्पेस, सॉफ्टवेयर ह्या क्षेत्रांबरोबर स्किल्ड ह्युमन कॅपिटल देखील एक्स्पोर्ट करतो. आज बहुतांश मोठ्या कंपन्यांचे सीईओ मूळ भारतीय वंशाचे आहेत, भारतात शिक्षण घेतलेले आहेत. आज भारतीय कूटनीती, सैन्यानिती, राजनीतीचा डंका समस्त जगात वाजतोय, भारताला वगळून आज कुठल्याच देशाला आंतरराष्ट्रीय राजकारण करणं, किंवा भूमिका घेणं शक्य नाहीय. आजचा भारत स्वतःच्या गरजा, स्वतःची ध्येय, धोरणं

बघुन भारताच्या हिताचे निर्णय घेतो, आणि त्याला समस्त जगाकडून मान्यता देखील मिळते. अगदी अमेरिकेच्या CAATSA सारख्या जाचक अटींमधून सूट मिळवणारा भारत हा एकमेव देश आहे. एकाचवेळी सौदी अरेबिया, इराण, इस्त्रायल त्याचबरोबर रशिया, युक्रेन सारख्या अतिशय विरुद्ध टोकाच्या देशांबरोबर भारत चर्चा करतो, आणि त्याला कुणाचाही आक्षेप नसतो, आज भारत युरोपमध्ये जाऊन, अमेरिकत जाऊन तिथल्या राजकारण्यांना खडे बोल, तर कधी आरसा दाखवु शकतो. हे एका रात्रीत नक्कीच घडलेलं नाही, त्यासाठी असंख्य परिश्रम भारतातील अनेक नेत्यांनी, सरकारांनी घेतले, त्याबद्दल त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केलाच पाहिजे!! मोदींच्या काळात ह्या सगळ्यांवर सुवर्णकलश चढवला गेला आणि मोदींच्या काळात अनेक उत्तम निर्णय घेतले गेले हे त्यांचे विरोधकही नाकारणार नाहीत!!

ब्रिटनचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिलचं एक फेमस कोट होतं "India is merely a geographical expression it is no more a single country than the equator" चर्चिलला आत्मविश्वास होता की स्वतंत्र भारत कधीच तग धरू शकणार नाही. अर्थात भारतने चर्चिलला खोटं ठरवलं!! विविधतेत एकता ही भारताची सगळ्यात मोठी ताकद म्हणून पुढे आली. अगदी आरोग्य ह्या विषयाकडे बघितलं तरी गेल्या ७५ वर्षात आपण खूप मोठा पल्ला गाठलाय!! भारताचं पोलिओ अभियान तर जगासाठी उदाहरण आहे. आज हाच भारत जगातील सगळ्यात मोठं कोव्हीड टीकाकारण अभियान राबवत आहे. भारतीय डॉक्टरांना आज संपूर्ण जगात मागणी आहे. स्वातंत्र्य मिळालं तेंव्हा भारतीयांचं आयुर्मान साधारण ३२ वर्ष होतं, आज ते ७१ वर्ष आहे. आज भारत जगातील सगळ्यात तरुण देश आहे ज्याचं आयुर्मान २७ वर्ष आहे. भारताचं अवकाश क्षेत्र, क्षेपणास्त्र क्षेत्र, इस्रो, डीआरडीओ आज जगात डंका पिटतंय!! ह्या सगळ्याच श्रेय गेल्या ७५ वर्षातील भारतीय वैज्ञानिकांना जातं!! आज आपण चंद्र, मंगळ ह्यांच्यावर आपला झेंडा रोवला आहे. असे अनेक दाखले देता येतील, अगदी पानं भरून लिहिता येईल पण तरीही एक प्रश्न जो मी लेखाच्या आधी विचारला होता तो कायम आहे, भारतीय स्वातंत्र्यपूर्तीचा

काय??

मला विचाराल तर भारतीय स्वातंत्र्यपूर्तीचा नेमका गाभा आहे 'लोकशाही' जगातली सगळ्यात मोठी लोकशाही, होय मान्य आहे आपण सर्वोत्तम नसु ही, आपण आदर्शयुक्त परिपूर्ण देश नसु, आपल्याकडे भ्रष्टाचार आहे, सामाजिक दुही आहे, सडलेली जातीयवादी संघटना आहेत, उग्रवादी जुनाट मध्ययुगीन धर्मवेड्या आतंकवादी विचारसरणीची बोटावर मोजण्यायुक्त का होईना लोक, नेते आहेत!! पण तरीही आणीबाणीची अपवादात्मक परिस्थिती वगळता 'लोकशाही' व्यवस्थेबाबत भारत एक देश आणि आपण त्या देशाचे नागरिक म्हणुन कमालीचे जागरूक आहोत. बुद्धिवादी, डाव्या सो कॉल्ड विचारवंत जमातीला सोडल्यास सामान्य भारतीय नागरिकांना कधीही भारतीय लोकशाही संकटात सापडलेली वाटत नाही, त्यांना आपल्या घरावर तिरंगा लावण्याच्या #हर_घर_तिरंगा मोहिमेची लाज, चिंता वाटत नाही.

भारतीय लोकशाहीने सामान्य भारतीयाला त्याच्या आयुष्याला जी बहुमूल्य कलाटणी दिली आहे, कदाचित हेच भारतीय स्वातंत्र्याचं गमक असावं!! भारतीय स्वातंत्र्यपूर्तीचा गाभा भारतीय लोकशाही आहे!! आज भारत ज्या ठिकाणी उभा आहे त्याला ७५ वर्ष लागली आहे. ह्यात सगळ्या सरकारचं, सैनिकांचं, वैज्ञानिकांचे, शेतकऱ्यांचे, स्वातंत्र्य सैनिकांचे, मान मोडून निरपेक्षवृत्तीने पुढील पिढीसाठी मेहनत, परिश्रम करणाऱ्या स्वतंत्र्य भारताच्या पहिल्या दोन पिढ्यांचे योगदान आहे!! दुसऱ्यांशी तुलना करण्याच्या नादात आपण कधीकधी आपल्याला फार कमी लेखतो पण लक्षात घ्या भारतात स्वातंत्र्य मिळाल्या पासुन महिलांसकट प्रत्येक भारतीय प्रौढ व्यक्तीला मतदानाचा अधिकार आहे, इतका साधा निर्णय घ्यायला स्वतंत्र अमेरिकेला १५० वर्ष लागली!! लोकशाही व्यवस्थेत, इतकी विविधता असतांना, इतक्या बोली भाषा, संस्कृती असतांना भारत आज इन्फ्रास्ट्रक्चर, स्टार्टअप, डिफेन्स, सॉफ्टवेयर, वैद्यकीय, फार्मा, अशा अनेक क्षेत्रात वेगाने घोडदौड करतोय, काही ठिकाणी अग्रेसर आहे ह्याचं कौतुक व्हायला नको??

भारतासारख्या खंडप्राय, विविधतेने नटलेल्या देशासाठी हे सोपं काम नक्कीच नव्हतं, इतकं सगळं मिळवून सुद्धा भारताने आणि बहुतांश भारतीयांनी आपल्या भारतीय संस्कृतीशी असलेली आपली नाळ तोडली नाही. मध्ये काही वर्ष ती विरळ झाली होती, नाही असं नाही, पण आता ती पुन्हा जागेवर येतेय!! प्रत्येकवेळी नकारात्मकताच का बाळगा, कधी कधी सकारात्मकता ही बाळगुयात की!!

आज भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाकडे भारताबाहेर बसुन बघतांना प्रचंड समाधान आहे. भारताच्या प्रगतीचा, भारतीयत्वाचा, भारतीय म्हणुन मिळणाऱ्या वेगळ्या आदराचा कधीकधी सन्मानाचा, कौतुकाचा विषय जेंव्हा जेंव्हा निघतो तेंव्हा देशाविषयी, देशातल्या लोकांविषयी, मातीविषयी मनांत फक्त कृतज्ञताच येते!! कुठल्या आई-वडिलांपोटी जन्म घेणं जसं आपल्या हातात नसतं तसंच कुठल्या देशात जन्म घेणं हेही आपल्या हातात नसतं, ते असतं तर बहुतांश भारतीयांनी पाश्चिमात्य देशांत जन्म घेतला असता कदाचित!! जोक्स अपार्ट, सांगण्याचं तात्पर्य हे, की भारतात जन्माला आलो म्हणुन आपण काही पुण्यात्मा होत नाही, पण किमान ज्या देशाने आपल्याला त्याच्या अंगाखांद्यावर खेळवलं, वाढवलं, मोठं केलं त्या देशाबद्दल किमान कृतार्थ भाव, कृतज्ञतेचा भाव बाळगता आला तरी पुरे आहे असं वाटतं!! जाता जाता स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या ओळी आजच्या भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या अमृतमहात्सवानिमित्त आठवल्या त्या लिहून थांबतो!!

हे अधमरक्तरञ्जिते सुजनपूजिते श्री स्वतन्त्रते

तुजसाठि मरण तें जनन

तुजवीण जनन तें मरण

तुज सकल-चराचर-शरण चराचर-शरण

# स्वातंत्र्यदेवीस शरण!

- दिप्ती शिंदे दळवी

यंदा भारताचा ७५ वा स्वातंत्र्य दिन आपण साजरा केला. ह्या ७५ वर्षांत आपण अनेक बाबतीत प्रगती केली, अजून बऱ्याच बाबतीत प्रगती शेष आहे. पण आपण तीही करू, हा विश्वास हृदयी आहे.

एखाद्या राष्ट्राची योग्य प्रगती कशी होते? ती नक्कीच एका रात्रीत होत नाही. त्या प्रगतीमध्ये अनेक जीवांचं योगदान असतं, अनेक जणांनी स्वतःच रक्त सांडलेलं असतं, अनेकांनी घरादाराचा त्याग केलेला असतो, अनेकांनी भरपगारी नोकऱ्या लाथाडलेल्या असतात, अनेकांनी वैयक्तिक आयुष्याचा परित्याग केलेला असतो, अनेकांनी अजून काही नि अजून काही...कोठून येते एवढी राष्ट्रभक्ती? कोठून प्रसवतो मातृभूमीबद्दल इतका जिव्हाळा? कोठून बाळसं धरते, देशासाठी आत्मत्याग करण्याची महान, मंगल इच्छा?

स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणतात, देहाकडून देवाकडे जाताना मध्ये देश लागतो आणि ह्या देशाचे आपण देणे लागतो. किती तो उद्दात्त विचार! ह्या विचारात ओतप्रोत भरलेल्या देशप्रेमातील एक अंशतरी देशप्रेम आपल्यात आहे का? माहित नाही. पण उपरोल्लेखित विचार सावरकर उभं आयुष्य जगले, देशासाठी चंदनाप्रमाणे झिजले. सावरकरांनी राष्ट्रप्रेम हे त्यांच्या आयुष्यातील सर्वोच्च तत्व, कर्म, धर्म, ध्येय आणि स्वप्न मानलं. अतितीव्र, अवीट राष्ट्रप्रेमाचा दिवा आपल्या हृदयात सदैव जागृत ठेवला आणि हृदयात स्वातंत्र्यदेवीची प्रतिष्ठापना करून आजन्म भक्ती केली. मग ह्या भक्तीतून एखादी आर्त आरती निर्माण झाली नसती, तरच नवल! नाही का? सावरकरांनी लिहिलेल्या अशाच एका आरतीचा आपण आज आशय समजून घेऊयात.

जयोस्तुते श्रीमहन्मंगले ! शिवास्पदे शुभदे

स्वतंत्रते भगवती ! त्वामहं यशोयुतां वंदे

अर्थ:

अत्यंत महान, मंगल आणि पराकोटीच्या पवित्र अशा स्वातंत्र्य देवी, तुझा जयजयकार असो. हे अखंड यशस्विनी, मी तुला मनोभावे वंदन करतो.

राष्ट्राचे चैतन्य मूर्त तू नीती-संपदांची
स्वतंत्रते भगवती ! श्रीमती राज्ञी तू त्यांची
परवशतेच्या नभात तूची आकाशी होसी
स्वतंत्रते भगवती ! चांदणी चमचम लखलखसी
वंदे त्वामहं यशोयुतां वंदे

अर्थ:

तू भारत देशाचे मूर्त चैतन्य आहेस. तूच अनेक पवित्र तत्वं, मूल्यं इत्यादी संपदेची वैभवशाली राणी आहेस. पारतंत्र्याच्या आकाशात चमचमणारी, लखाखणारी तूच ती एकमेव चांदणी आहेस, हे स्वातंत्र्य देवी. हे अखंड यशस्विनी, मी तुला मनोभावे वंदन करतो.

गालावरच्या कुसुमी किंवा कुसुमांच्या गाली
स्वतंत्रते भगवती ! तूच जी विलसतसे लाली
तू सूर्याचे तेज, उदधीचे गांभीर्यहि तूची
स्वतंत्रते भगवती ! अन्यथा ग्रहण नष्ट तेची
वंदे त्वामहं यशोयुतां वंदे

अर्थ:

गालांवरील फुलांवर किंवा फुलांच्या गालांवर खुलणारी लाली तूच आहेस. हे स्वातंत्र्य देवी, तूच अखंड तेजस्वी सूर्याचं तेज आहेस आणि अथांग, अफाट समुद्राचं

धीरगांभीर्यसुद्धा तूच आहेस. आणि स्वातंत्र्यसूर्याला लागलेल्या पारतंत्र्याच्या ग्रहणाचा मोक्ष करणारीही तूच आहेस. हे अखंड यशस्विनी, मी तुला मनोभावे वंदन करतो.

मोक्ष-मुक्ति ही तुझीच रूपे तुलाच वेदांती
स्वतंत्रते भगवती ! योगिजन परब्रम्ह वदती
जे जे उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर ते ते
स्वतंत्रते भगवती ! सर्व तव सहचारी होते
वंदे त्वामहं यशोयुतां वंदे

अर्थ:

वेदांमध्ये कथित मोक्ष, मुक्ती ही सारी तुझीच रूपं आहेत. योगीमुनी ज्या तत्वाला परब्रह्म म्हणतात, ते अत्युच्च तत्व तूच आहेस. ह्या विश्वात जे जे काही उदात्त, उन्नत, महान, मधुर आहे, ते सर्व तुझ्याचसोबत आहे, तुझाच भाग आहे. हे अखंड यशस्विनी, मी तुला मनोभावे वंदन करतो.

हे अधम-रक्तरंजिते, सुजन पूजिते, श्रीस्वतंत्रते
तुजसाठि मरण ते जनन, तुजवीण जनन ते मरण
तुज सकल चराचर शरण, चराचर शरण, श्रीस्वतंत्रते
वंदे त्वामहं यशोयुतां वंदे

अर्थ:

हे अधमांच्या म्हणजेच दुर्जनांच्या रक्ताने माखलेल्या आणि सुजनानी म्हणजे सज्जनांनी पुजलेल्या श्री स्वातंत्र्य देवी तुझ्यासाठी जीव देणं म्हणजे खरं जगणं आणि तुझ्याविना जगणं म्हणजे खरं मरण आहे. हे संपूर्ण चराचर तुला शरण आहे, हे देवी. हे अखंड यशस्विनी, मी तुला मनोभावे वंदन करतो.

ही आरती का महत्त्वाची आहे? कारण ह्यात भारतीय तत्वज्ञानाच सार आहे. भारतीय तत्वज्ञानाने स्वातंत्र्य ह्या तत्वाला अनन्यसाधारण महत्त्व दिलं आहे. आपल्याला त्रास देणाऱ्या, आपल्याला नको त्या गोष्टींत अडकवून ठेवणाऱ्या, आपल्याला आपली प्रगती आपल्याला हवी त्या प्रकारे करू न देणाऱ्या, आपलं अस्तित्व नाकारून आपल्यावर अधिराज्य गाजवणाऱ्या, आपल्याला दुष्ट हेतूने नियंत्रित करणाऱ्या प्रत्येक शक्तीपासून (मूर्त किंवा अमूर्त) आपण मुक्त व्हायला हवं, स्वतंत्र व्हायला हवं. जन्माला आलेल्या प्रत्येक जीवाचा शेवटापर्यंत स्वातंत्र्य मिळवण्यासाठीच  संघर्ष सुरू असतो - दुःखापासून मुक्ती,  षड्रिपूंपासून मुक्ती, दुर्जनांपासून मुक्ती, अज्ञानापासून मुक्ती आणि आपल्याला मोकळा श्वास घेण्यापासून रोखणाऱ्या प्रत्येक तत्व, मूल्य, विचार, धारणा, वर्तन इत्यादी द्रव्यांपासून मुक्ती... मग ह्या मुक्तीसाठी स्वातंत्र्यदेवीलाच शरण जायला नको का? आणि हीच शरणागती अधोरेखित करणारी ही आरती आहे आणि म्हणूनच ही आरती स्वातंत्र्यदेवी इतकीच महान आणि मंगल आहे.

# नारी तू नारायणी

- मधुरा कुलकर्णी

विश्वातल्या प्रत्येक  पदार्थ असलेल्या सजीव प्राण्यास आपापले स्वातंत्र्य उपभोगणे हा परमाधिकार वाटतो. भारत देशाचा इतिहास हा विजयाचा इतिहास आहे आणि विविध आक्रमण या देशावर झाली असली तरी वीर पुरुष आणि वीर स्त्रियांनी ती परतावून लावली. याच अखंड संघर्षाच्या जाज्वल्य वारसा लाभल्यामुळे ते स्वातंत्र्य खंडित झाले तरी पुन्हा पुनर्रचित होऊ शकले...

"पुढती नेम काही ढळला

ध्वज जरी करातून गळला

उचलूया पुनरपी प्राणा लावूनी पणा..."

या विनायक दामोदर सावरकरांच्या ओळींनुसार विजयाची परंपरा खंडित झाली असली तरी हुतात्मे आणि वीर रसाचा आदर्श घेऊन तो स्वातंत्र्याचा तेजो भास्कर परवशतेचा अंधार चिरून सदैव उदयाभिमुख असेल.

स्त्री ही पुरुषापेक्षा काकणभर सरसच असते. स्त्री चा कणखरपणा, जिद्द सेवाभाव यांचा उपयोग भारताला ब्रिटीश राजवटीपासून मुक्त करण्यासाठी करूनच घेतला पाहिजे ह्या विचारावर सुभाषचन्द्र बोस सदैव ठाम होते. याच विचाराने ११ जुलै १९४३ साली त्यांनी सिंगापूर येथे 'झाशीची राणी रेजिमेंट' ह्या महिला संघटनेची स्थापना केली. सुरवातीला फक्त १५ महिलांसह संघटना स्थापन झाली. संघटनेचे नेतृत्व डॉ. लक्ष्मी स्वामिनाथन यांच्याकडे सोपविण्यात आले. २५ संघटनेचे दोन विभाग होते. एक परिचारिका आणि दुसरा सैनिकी प्रत्येक महिलेला हिंदीत (बंधनकारक) संभाषण करणे आवश्यक होते. जंगलयुद्ध , गनिमीकावा, तसेच हेरगिरी यांचे प्रशिक्षण स्वतः नेताजी देत.

राणी झाशी रेजिमेंट च्या मुलीचे धैर्य आणि कामावरची निष्ठा प्रशंसनीय

होती. आघाडीवरील इस्पितळात मशिनगनचा मारा व बॉम्बहल्ले यामुळे मुलीचे मानसिक धैर्य जराही डळमळत नसे. आपल्या सेवेसाठी भगिनींना पाहून जवानांचे अर्धे दुखणे बरे होई. सर्व परिचारिका म्हणजे तावून सुलाखून निघालेल्या पोलादी महिला होत्या मोजक्या स्त्रियांचे कर्तृत्व आपण जाणून घेऊ.

कॅ. लक्ष्मी सहगल:

कॅ. लक्ष्मी सहगल यांचे मूळ नाव लक्ष्मी स्वामीनाथन होते. त्यांचा जन्म २४ ऑक्टोबर १९१४ ला त्या वेळच्या मद्रास येथील एका तामिळ परिवारात झाला. त्याचे वडिल वकील होते तर आई सामाजिक कार्यकर्ती त्यांच्या लहानपणीच वडिलांचे निधन झाले. असे असूनही त्यानी स्वत: च्या हिमतीवर स्वतः चे शिक्षण पूर्ण केले व १९३८ साली मद्रास मेडिकल कॉलेज मधून M.B.B.S. पदवी पूर्ण करून डॉ. लक्ष्मी स्वामीनाथन् बनल्या. त्यानंतर एका वर्षात त्या प्रसूतितज्ञ (गायनाकॉलॉजिस्ट) बनल्या. त्या १९४० मध्ये सिंगापूरला गेल्या. तिथे मोठ्या प्रमाणावर गरीब मजूर राहत होते. त्यांनी तेथे ह्या मजुरांसाठी दवाखाना उघडला. त्या अत्यंत वाजवी दरात मजुराचा इलाज करीत.

१९४३ साली नेताजी सुभाषचंद्र बोस सिंगापूरला पोहोचले. तेथील जपानी लोकांच्या मदतीने त्यांनी आझाद हिंद फौजेची स्थापना केली. डॉक्टर लक्ष्मी स्वामीनाथन् यांना जेव्हा आझाद हिंद फौजेतील महिलांच्या तुकडीत सामील होण्याबाबत कळले तेव्हा त्या नेताजींना जाऊन भेटल्या.

त्यांची भेट व चर्चा सुमारे ५-६ तास चालली. या भेटीनंतर नेताजी एवढे खुष झाले की आझाद हिंद सेनेच्या महिला गटाची जबाबदारी डॉ. लक्ष्मीवर सोपवली आणि त्यांना कॅप्टन ही पदवी मिळाली तेव्हापासून डॉ. लक्ष्मी स्वामीनाथन् या के लक्ष्मी या नावाने प्रसिद्ध झाल्या. १९४६ साली आझाद हिंद फौजेने आजच्या म्यानमारवर हल्ला केला, पण त्यात त्यांची हार झाली व कॅप्टन लक्ष्मी यांना तुरुंगात जावे लागले. तुरुंगातून सुटका झाल्यावर त्यांचा कर्नल सहगल यांचे बरोबर विवाह झाला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आणि देशाच्या फाळणीनंतर त्या कानपूरला स्थायिक झाल्या त्यानी कानपूरमध्ये आपला दवाखाना सुरू केला व पूर्वीप्रमाणे गरीब जनतेसाठी सेवा सुरू केली.

- १९७९ मध्ये कॅप्टन लक्ष्मी सहगल कम्युनिस्ट पार्टीतर्फे राज्य सभेवर निवडून आल्या
- १९८४ साली श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर शीखविरोधी दंगलीतही त्यांनी शीख समाजाचे रक्षण केले
- १९९८ साली त्यांना 'पद्मविभूषण' हा नागरी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# अमृत महोत्सवी सोहळा

- अंजली मनीष उपाध्ये

ए मेरे वतन के लोगो,

जरा आँख में भर लो पानी,

जो शहीद हुए है उनकी ,

जरा याद करो कुर्बानी

कवी प्रदीप यांच्या या गीताच्या ओळी कानांवर आल्या की खरोखरीच भारताच्या अनेक सुपुत्रांची आठवण होते. १५० वर्ष आपल्या देशाला गुलामगिरीच्या शृंखलेत जखडून ठेवणाऱ्या इंग्रजांना हुसकून लावण्यासाठी कित्येक सुपुत्रांनी आपले प्राण पणाला लावले. आपल्या मातृभूमीच्या मुक्ततेसाठी हसत हसत ते फाशी गेले .त्यांचे बलिदान व्यर्थ गेले नाही. तब्बल दीडशे वर्षाच्या काळोखानंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतात स्वातंत्र्य सूर्य उदयाला आला. स्वातंत्र्य सूर्याच्या तेजस्वी प्रकाशात आपल्या प्रगतीच्या नव्या दिशा, नव्या आशा शोधत आपण यशाची शिखरे गाठत आहोत .हे सारे सुख नव्या पिढीला देण्यासाठी इंग्रजांविरुद्ध प्रखर लढा देणारे, स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात प्राण्यांची आहुती देणारे भारत मातेचे अनेक सुपुत्र त्यांची आठवण आम्हा सर्व भारतीयांनी ठेवली पाहिजे.

अमृता समान तेजोमय अशाचे स्मरण करणे म्हणजे या भगव्यात त्यांचे चैतन्य स्मरण करणे. या पांढऱ्या रंगात त्यांचा त्यागस्मरण करणे. हिरव्या मध्ये त्यांची प्रेरक शक्ती स्मरण करणे. तर निळ्या रंगात अपार विशाल मनाला स्मरण करणे. “भारताचा हा तिरंगा ,उंच नित नित राहो वैभवाचे स्वर्ण पर्व माय भू पाहो.”

१५ ऑगस्ट १९४७ स्वातंत्र्याची रम्य पहाट झाली. असंख्य बलिदानांचे सार्थक झाले आणि भारत पारतंत्र्यातून मुक्त झाला. बघता बघता स्वातंत्र्याचा प्रवास 75 वर्षाचा होत आहे. सध्या आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. आपण

कमावलं आणि काय गमावलं याचे सिंहावलोकन करण्याच्या टप्प्यावर आपण येऊन पोहोचलो आहोत. भारत हा नैसर्गिक साधन संपत्ती आणि खनिज समृद्ध देश आहे . माथी हिमालय उभा आहे पायी सागराच्या लाटा लोळण घालत आहेत .सैनिक आणि जवान डोळ्यात तेल घालून देशाची सीमा रक्षण करत आहेत. बळीराजा लोक राजा बनला आहे. भारताला सिमला मनाली सारखी समृद्ध पर्यटन स्थळे लाभली आहेत. एकूणच भारत देश सुजलाम सुफलाम आहे.

देशाला पौराणिक आणि ऐतिहासिक संस्कृतीचा मोलाचा वाटा लाभलेला आहे. आपल्या देशाची संस्कृती आज जागतिक पातळीवर सर्वश्रेष्ठ मानली जाते. अनेक जाती, धर्म ,पंथ, भाषांचे लोक येथे गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात गेली ७५ वर्ष साहित्य, कला ,क्रीडा ,संस्कृती या क्षेत्रामध्ये अनेक नामवंतांनी आपला अमिट ठसा उमटवला आहे .एकीकडे प्रगती होत आहे पण दुसरीकडे काही गोष्टी मनाला वेदनादायक ठरत आहे.

स्वातंत्र्यासाठी अनेक शूरवीरांनी ऐन तारुण्यात बलिदान दिले .स्वातंत्र्यासाठी रक्ताचा सडा सांडला. पण आजची परिस्थिती बघता चीन, पाकिस्तान सारख्या परकीय शक्ती सीमेवर आक्रमणाच्या तयारीत असतात. देशात दहशतवादी हल्ले होतात. पुरी, पुलवामा सारख्या रक्ताळलेल्या आठवणी दुःख देतात. शेतकऱ्याला आपल्या हक्कांसाठी आंदोलन करावे लागते. भारताचे नंदनवन असलेले काश्मीर, गुलाबाच्या सुगंधासाठी दरवळत राहण्याऐवजी रक्तात रंगताना पाहायला मिळते. एकाच आईची लेकरे एकमेकांच्या रक्तासाठी तहानलेली असतील तर ......त्या आईची काय अवस्था होईल! या साऱ्या आक्रमणांमध्ये अतिशय सामान्य माणूस भरडला जातो.

मोठमोठ्या अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक होते तेव्हा ज्यांच्या हाती आपण देशाची प्रशासन व्यवस्था सोपवली आहे तेच भ्रष्टाचाराने बरबटलेले पाहून असंख्य वेदना होतात. "सत्यमेव जयते " हे ब्रीदवाक्य आपल्या देशाची शान आहे परंतु अशा दुष्ट प्रवृत्तींमुळे देश शोकग्रस्त होतो. अवघ्या चौदाव्या

वर्षी शरीरावर गोळी झेलणारे शिरीष कुमार सारखे तरुण पाहिले तर आजच्या या तरुण पिढीकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या स्वातंत्र्याचा अर्थ त्यांना कधी कळेल का? असा प्रश्न पडतो. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव हे स्वावलंबनाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे .अमृत महोत्सवाच्या आयोजनामध्ये स्वातंत्र्यलढ्याची भावना व त्याग अनुभवता येणार आहे.

या अमृत महोत्सवानिमित्त भारत सरकार द्वारा देशाच्या गौरवासाठी व तिरंग्याच्या सन्मानासाठी "हर घर तिरंगा "हा अभिनव उपक्रम राबवला गेला गेला आहे .आज प्रत्येक घरावरच नव्हे तर प्रत्येकाच्या मनामध्येही हा तिरंगा डौलाने डोलत आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव देशाचा आनंद उत्सव साजरा करण्याचे उद्दिष्ट २०४७ मध्ये भारतासाठी एक व्हिजन तयार करणे आहे .स्वातंत्र्याचा संघर्ष ७५ वर्षाच्या विचारांच्या आधारे साजरा केला जात आहे. ७५ वर्षाची उपलब्धी ,कृती, संकल्प यांची जाणीव तरुण पिढीला करून द्यावी जेणेकरून त्यांना पुढे जाण्याची आणि स्वतंत्र भारताची स्वप्न साकार करण्याची प्रेरणा मिळेल.

आजादी का अमृत महोत्सव ही आपल्या स्वातंत्र्यसैनिकांना आणि स्वातंत्र्य चळवळीला दिलेली श्रद्धांजली आहे .विविधतेत एकता हे भारताचे अनोखे वैशिष्ट्य आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत देशाने अनेक क्षेत्रात प्रगती केली आहे .विज्ञान, शेती ,तंत्रज्ञान ,आरोग्य ,शिक्षण, वाहतूक अशा अनेक क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली आहे.

जे देशासाठी लढले,

ते अमर हुतात्मे झाले

१५० वर्ष पारतंत्र्य व त्यातून मुक्ततेसाठीचा संघर्ष खूप मोठा आहे. अमृत महोत्सवी वर्ष हा आपल्या भारत देशासाठी खूप मोठा टप्पा आहे. जगाला कवेत घेण्याची क्षमता भारत देशाकडे आहे. आज नवनिर्माणाच्या नव्या दिशा आपण शोधल्या आहेत. आपल्या संस्कृतीचा उद्घोष करून आपण समृद्धीची शिखरे चढत चाललेलो आहोत. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाकडून शतक महोत्सवाकडे

वाटचाल करताना नकारात्मक बाबींवर आपण मात करू शकलो तरच आपला भारत बलसागर होऊन विश्वात शोभून दिसेल .

आपला देश गौतम बुद्धांच्या आणि भगवान महावीरांच्या तत्त्वज्ञानाला जन्म देणारा आहे. आयुष्याचे शस्त्र बनवून स्वातंत्र्य मिळवणारा पृथ्वीच्या पाठीवरील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत....... "प्रतिज्ञा" केवळ म्हणण्यासाठी नव्हे तर जगण्यासाठी असते आणि ती प्रत्येक भारतीयांनी जगली पाहिजे. बस........तर आणि तरच खऱ्या अर्थाने भारतभूमीला आपला अभिमान वाटेल. चला आपण सारे एक होऊया आपल्या देशाची महान संस्कृती, अनमोल ऐतिहासिक वारसा आणि परंपरा, पराक्रमी आणि जाज्वल्य इतिहास, विविधतेतून एकता असलेले चित्र याची जपणूक करूया आणि युवा देश विकसित देश म्हणून जगासमोर सदैव आदर्श निर्माण करूया .

स्वातंत्र्याची ध्वजा फडकते,

सूर्य तळपतो प्रगतीचा ,

भारत भूमीच्या पराक्रमाला

मुजरा माझा मानाचा.

भारत माता की जय

"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

# दीपशिखा

- मैथिली अंजनकर

आज भारताला स्वातंत्र मिळुन ७५ वर्षांचा काळ लोटला . या वर्षी आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव देखील साजरा केला . भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे स्वप्न अनेकांनी पाहिले व असंख्य देशभक्त लोकांनी , समाजसुधारकांनी त्यासाठी बरीच मेहनत देखील घेतली .

आधुनिक कळात स्त्री कोणत्याही क्षेत्रात मागे नाही त्याचप्रमाणे स्वातंत्र्यपूर्व कळात देखील स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्या मागे नव्हत्या. अनेक स्त्रियांनी या स्वातंत्र्याच्या संग्रामात स्वत: ला वाहून दिले ; तर काहीनी स्वत: च्या मुलांना तसे घडवले , तर काही आपल्या पतीच्या खांद्याला खांदा लावून यात सहभागी झाल्या यातीलच काही स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय खालीलप्रमाणे आहे -

१ . जिजाबाई -

शिवाजी महाराज्यांसारख्या थोर पुरुषाला जन्म देणारी माता म्हणजेच जिजाबाई. मुघलांपासून स्वातंत्र मिळवून देण्याचे स्वप्न त्यांनी शिवाजी महाराजांमध्ये अगदी बालपणापासूनच ठसविले . आदर्श स्वराज्याचे चित्र डोळ्यासमोर उभारून त्यासाठी आवश्यक असणारी चिकाटि धैर्य, सहनशीलता , न्यायनिष्ठुरता या गुणांची जोपासना शिवाजीमहाराजांमध्ये जिजाबाईनीच रुजविली . आपल्या सर्व शक्ती पणाला लावून त्यांनी शिवाजीराजांना आदर्श राज्यकर्ता बनविले पुण्याच्या जहांगिरीची व्यवस्था पाहात असतानाच जिजाबाईनी दादोजी कोंडदेव यांच्या मदतीने शिवाजी राजांना राज्यकारभाराचे शिक्षण दिले .

२ . अहिल्याबाई होळकर -

अहिल्याबाई होळकरांनी स्वत:च्या कर्तृत्वाची साक्ष इतिहासावर उमटविली आहे . एक अत्यंत करारी , तडफ़दार व्यक्तिमत्तवाची स्त्री म्हणून इतिहासाने

अहिल्याबाईला गौरवले आहे . उत्तम प्रशाशक आणि न्यायी म्हणुन त्यांची ख्याती होती . त्यांच्या स्वभावात मृदुता होती . वेळप्रसंगी तडजोड करणे ही त्या पसंत करीत असल्यातरी आवश्यक प्रसंगी तेथे त्या वज्राहूनही कठोर बनत . त्यांनी त्यांच्या कार्यकाळात अनेक सामाजिक कार्य केली . त्यात विहिरी , धर्मशाळा, पूल , घाट देवळे यांचा समावेश आहे .

त्यांच्या राज्यकारभाराविषयी प्रसिद्ध इतिहासकार सर जॉन माल्कन म्हणतो " हिची अंतर्गत राज्यव्यवस्था आश्चर्य वाटावे इतकी नमुनेदार होती , तिच्या मर्यादा लक्षात घेऊन असे म्हणावे वाटते की , ती एक विशुध्द मनाची आदर्श राज्यकर्ती होती ."

३. झाशीची राणी लक्ष्मीबाई

आजही राणी लक्ष्मीबाई म्हटले की झाशीचे स्वातंत्र्ययुध्द आठवते. लक्ष्मीबाईचा अनोखा निर्धार आठवतो ' मेरी झाशी नही दुंगी ! हे तिचे ब्रीद आठवते. इ. स. १८५७ मध्ये राणीने एक वर्ष राज्य ताब्यात घेऊन राज्याचा उत्तम बंदोबस्त ठेवला. स्वसंरक्षणाची तयारी केली. झाशी शहरात दारुगोळा बनविण्याचा एक कारखानाही तिने सुरु केला. अकरा दिवस राणीने इंग्रजांचा सतत प्रतिकार केला. अखेर निरुपायाने निवडक सैन्यासह घोडयावर स्वार होऊन आणि मुलाला पाठीवर बांधून झाशीच्या बाहेर पडली, व या युध्दातच एक गोळी तिच्या वर्मी लागली. मस्तकावर एक वार बसला. ती घायाळ झाली व घोडयावरून खाली कोसळली व तिथेच तिचा अंत झाला. अशी ही वीरांगना अनेक वीरांचे स्फूर्तिस्थान बनली. झलकारीदेवी ही लढवय्यी स्त्री लक्ष्मीबाईची जिवलग सखी होती.

४. इंदिरा गांधी -

प्रियदर्शिनी इंदिरा गांधी आयर्न लेडी म्हणून आपल्याला परिचित आहेत . भारतीय स्वातंत्र्यलढयात पिता जवाहरलाल नेहरु आणि महात्मागांधी यांच्यासोबत त्यांनी उत्तम कर्तृत्व पार पाडले .

इंदिरा गांधीच्या मातोश्री कमला नेहरू , आत्या विजयालक्ष्मी  पंडीत या सुद्धा स्वातंत्र्यचळवळीत अग्रणी होत्या सरोजिनी नायडु या कवयित्री आणि थोर स्वातंत्र्यसेनानी होत्या. अरुणा असफ़अली यांनी भारताचा स्वातंत्र्यध्वज पहिल्यांदा फ़डकविला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जर्मन पत्नी हीसुद्धा थोर स्वातंत्र्यसेनानी होती .

महात्मा गांधी यांच्या पत्नी कस्तुरबा याही स्वातंत्र्यचळवळित अग्रणीच होत्या. दक्षिण आफ्रिकेतही त्या तिथल्या जुलमी राजवटिविरुद्ध महात्मा गांधीच्या खांदयाला खांदा लावून लढल्या.

गीता साने, गोदावरी परुळेकर, ताराबेन मश्रुवाला, इत्यादी स्त्रियांनी गांधीजीच्या स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदविला आणि राष्ट्रनिष्ठा प्रत्यक्ष जगण्यात उतरवून दाखविली.

या स्त्रिया स्वत: स्वातंत्र्यासा लढल्या किंवा त्यांनी मुलांना तसे घडविले याव्यतिरिक्त ज्यांनी आपली लेखणिच शस्त्र म्हणून वापरली त्या संस्कृत साहित्यातील विद्वान पंडीता क्षमाराव होय . क्षमारावांना साहित्याचा वारसा त्यांच्या वडीलांपासून प्राप्त झाला . संस्कृत भाषेसोबतच इंग्रजी व इतर भाषावरही त्यांचे प्रभुत्त्व होते . संतसाहित्यावर त्यांचा विशेष पगडा होता . महात्मा गांधी हे क्षमादेवीचे आदर्श होते , त्या भावनेने त्यांनी ‘ सत्याग्रहगीता’ नावाचे काव्यच  लिहिले . त्यात गांधीनी सत्याग्रहाची कल्पना कशी मांडली ,अंहिसादी  त्यांची तत्वे कोणती होती , त्यांच्या आयुष्यातील महत्वाच्या घटना कोणत्या हे ( भगवद् गीतेप्रमाणे ) १८ अध्यायातून , ६५० संस्कृत श्लोकांद्वारे सांगितले आहे . गांधी - आयर्विन करारापर्यंतच्या घटना त्यात आहेत . ही गीता १९३२ मध्ये पॅरिसमध्ये प्रसिद्ध झाली . त्यानंतर क्षमादेवीनी ‘उत्तर सत्याग्रहगीता गीता लिहिली व इंग्रजी अनुवादासह मुंबईत ती प्रकाशित झाली .

ब्रिटिशांशी व्यावहारिक संबंध असले तरी स्वत:क्षमा राव यांनी भारतीय स्वातंत्र्यचळवळित भाग घेण्याची फ़ार इच्छा होती . महात्माजींचे त्यांच्याशी

कौटुंबिक संबंध होते. पण महात्माजींनी क्षमाला तशी अनुमती दिली नाही. मग त्या कस्तुरबांबरोबर गुजरातेतील खेड्यापाड्यांतून हिंडल्या. त्या वेळी तेथील खेडुत स्त्रियांचा पराक्रम व कणखरपणा त्यांनी पाहिला. या सत्यघटनांवर आधारित लघुकथा त्यांनी लिहिल्या. लघुकथा हा प्रकार संस्कृत साहित्यात पहिल्यांदा त्यांनीच आणला.

या सर्व थोर स्वातंत्र्यसैनिक, वीरांगणा स्त्रिया म्हणजे देशाच्या स्वातंत्र्यलढयात स्वत:हून आत्माहुती देण्याच्या व्रताने प्रेरीत झालेल्या जणु पवित्रतम समिधाच होत. या सर्व स्त्रियांनी आपल्या घरादारावर तुळशीपत्र ठेवून स्वत:च्या भैतिक इच्छाकांक्षांची तिलांजली दिली. हे स्वतंत्र भारतवर्ष या महान क्रांतिकारक सबलांना - प्रेरक माताभगिंनीना कदापिही विसरु शकत नाही. राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या या अमृतमहोत्सवी वर्षात या सर्व प्रकाशमान तारकांना कृतज्ञतापूर्वक शतशतदा नमन !

# अमृतकाळ

- संजीवनी मराठे

या भारतात बंधुभाव नित्य वसु दे, दे वरची असा दे

हा जातीभाव विसरूनी या एक हो आम्ही,

अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातूनी

खलनिंदका मनी ही सत्य, न्याय वसु दे ,

मतभेद नसू दे .

आज आमच्या राष्ट्रसंत तुकडोजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमात हे गीत गाताना आपण आज हे गीत भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत काळात सादर करतोय ही भावना मनाला एक वेगळा च आनंद देऊन गेली.

कधी- कधी विचित्र वाटतं, हसायला येतं,आश्चर्य आणि आदरयुक्त असा विस्मय वाटतो एका बाबतीचा की असे कसे विचित्र रसायन आहोत आपण भारतीय म्हणजे पण?

अनादी काळाची आमची परंपरा. पहिले भूर्जपत्रावर लिहिण्याची सोय नव्हती तेव्हा मुखोद्गत करून शिष्यांद्वारे पुढील पिढीला संस्कार व संस्कृती देणारी इतकी सनातन आमची संस्कृती. नंतर आलेला कर्मठवाद ,मग आलेला बडाजाव ,मग पुन्हा धर्मस्थापना मग पुन्हा वर्णाश्रम व्यवस्था मग पंथ, धर्म ,संप्रदायाची भिन्नता ,भांडणे, परकीय आक्रमणे मग परत एकत्रित येऊन स्वराज्याची स्थापना ,परत आक्रमणे, गुलामगिरी ,विभाजन मग परत एकीकरण व नंतर असा परिश्रमांनी मिळवलेली स्वतंत्रता किती -किती म्हणून सांगायचे ? किती विविध परिस्थिती काळ ,संकटं ह्या देशाने पाहिलेत ,अत्याचार सहन केलेत, कधी- कधी स्वत्व हरवल्यासारखी इथले लोक हवालदिल झाले .मनाने दुबळे झाले ,धर्म-अधर्म यांमधला फरक ते ओळखेनासे झाले, तर त्यांच्या मनाला उभारी आणणारे लोक

कधी योद्धा रूपात, कधी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या रूपात असे एक ना अनेक रूपात आपण या देशाचे तेजस्वी व ओजस्वी असे अनेक सुपुत्र आणि वीर कन्याही पाहिल्या.

सतीची चालरीत पाळणाऱ्या ह्याच देशात आधी गार्गी मैत्रैयी, कात्यायनी, यांसारख्या विदुषी झाल्या व नंतर आनंदीबाई जोशी ,रमाबाई रानडे ,यांसारखे स्त्रीरत्न ही आपण पाहिले. जातीभेद पाळणाऱ्या ह्याच देशात आपल्या ज्ञानेश्वर माऊलींनी सगळ्यांसाठी सर्वसमावेशक असा वारकरी संप्रदाय स्थापन केला. गौतम बुद्धांना श्रीविष्णूंचा अवतार मानणारे लोक आपण या भारत भूमीत पाहतो. भाऊबीजेसोबत राखी सुद्धा आपलीच म्हणून साजरे करणारे आपले अनेक बांधव पाहतो. आजच्या या आधुनिक काळात भारताच्या भौगोलिक सीमा, हवाई सीमा, नौदल सीमा यावर सदैव डोळ्यात तेल घालून आपली काळजी वाहणारे आपले सैनिक बांधव आपण बघतो, ज्यांच्यासाठी मग आपले कवी अनाम वीरा वगैरे म्हणून अनेक कविता लिहितात ..अनेक जण कथाही लिहितात या चांगल्या गोष्टी तर आहेतच पण त्यासोबत आपण एकमेकांसोबत भांडतो सुद्धा किती बघा ना !

अनेक वेळा सरकार विरोधात आंदोलने, उपोषणे, संप पुकारतो, रस्त्यावर उतरून मोर्चे काढून आपले मतभेद व्यक्त करतो, मागण्या मांडतो, देशासमोरच्या अनेक समस्यांना सरकार सोबतच इथला प्रत्येक माणूस तोंड देतो... मग विषय कोणताही असू दे. मंदी, महागाई, भ्रष्टाचार, घोटाळे, दहशतवाद, कश्मीरी पंडित, मागासवर्गीयांचे मुद्दे व मागण्या, त्यात आपला कृषीप्रधान देश त्याला विचारात घेऊन विज्ञानात विकासाचे शिखर गाठणे म्हणजे सोपी नव्हेच. त्यात भर म्हणून अशिक्षिततेच इतकं प्रमाण, लोकसंख्या वाढ, न्यायव्यवस्थेवर प्रलंबित प्रकरणांचा भार, असे एक ना अनेक मुद्दे आहेत तरी एक गोष्ट त्रिवार सत्य आहे की, भारतीयांच्या मनात त्यांच्या या मातृभूमीबाबत अपार प्रेम, सहिष्णुवृत्ती व अंतःकरणात धार्मिकता व उदारता आहे.

आज आपल्या देशानी स्वातंत्र्याच्या अमृतकाळात प्रवेश केला आहे. अनेक

संकटांचा सामना करून आज आपण इतके सुखाचे ,आनंदाचे दिवस पाहतो आहे. कितीतरी जणांचं बलिदान कितीतरी जणांचा त्याग, कितीतरी जणांनी दाखवलेलं औदार्य याची परिणती म्हणजे आजची आपली समृद्धता आहे. आज आपण इतके सुखी- निश्चिंत आहोत ते काही संपूर्ण कर्तृत्व आपलं नाही ते आपल्या आधीच्या अनेक पिढ्यांचं आहे. ज्या या देशासाठी, या मातृभूमीसाठी झटल्या ,ज्यांनी या देशाचा सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी अथक परिश्रम घेतले त्यांना याचं श्रेय जातं. भारताची स्वतःची अशी एक ओळख आंतरराष्ट्रीय पातळीवर बनवण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले, काहींचे भाग्य थोर की त्यांना त्यांची स्वप्नपूर्ती होताना याची देही याची डोळा पाहता आली आणि काहींच्या अनेक पिढ्या ह्याच्यासाठी झटल्या.

जगाला योगासनं, प्राणायाम, ओमकार, स्थापत्यशास्त्र, खगोलशास्त्र ,भूगर्भशास्त्र ,अश्या एक ना अनेक विषयात योगदान देऊन आज आपला स्वतंत्र भारत पुढे स्वयंपूर्ण भारत होण्याच्या वाटचालीवर आहे. या यशाचं थोडंसं ही श्रेय आपल्याकडे नाही असं माझं मत नाही परंतु "इदं न मम् " ही भारताची आधीपासूनची अशी स्वतःची सहजवृत्ती राहिलेली आहे.

अनेक बाबतीत आपल्या देशानी मिळवलेलं यश हे आपल्यासाठी अभिमानाची बाब तर नक्कीच आहे परंतु त्यासोबत आपल्यावर फार मोठी अशी एक जबाबदारी आहे. ज्या देशाचे आपण नागरिक आहोत जिथे आपण जन्म घेतला त्या मातृभूमीचं पुनरुत्थान करून तिचं नाव, तिचा झेंडा घेऊन तिच्या ऋणाची आपल्या क्षमतेनुसार परतफेड करून जगभर तिच्या कर्तुत्वाचा डंका आपल्याला गाजवायचा आहे.

ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला.. ते शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती देव, देश आणि धर्मा पायी प्राण घेतलं हाती ...ते हीच आमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे माणसाने माणसाशी माणसासम वागणे ह्या विश्वबंधुत्वाचा संदेश देण्यापर्यंतचा ह्या भारताचा प्रवास आहे... सगळ्या वाचकांना भारताच्या या अमृत महोत्सवाच्या खूप खूप शुभेच्छा!

# भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचे योगदान

- सौ.निता प्रकाश

भारत माता पारतंत्र्यात असताना तिला ब्रिटिशांच्या गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी अनेक लोकांनी बलिदान दिले आहे.त्यात आबाल वृद्धांपासून तर सामान्य जनतेपर्यंत पुरुषांपासून ते स्त्रियांपर्यंत सर्वांनी आपापल्या परीने योगदान दिलेले आहे. स्त्रियांनी आपलं घर कुटुंब ही जबाबदारी सांभाळून भारत मातेला स्वतंत्र करण्याच्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. सगळ्यांना आस होती ती भारत मातेला मुक्त करण्याची.

देशाच्या या आंदोलनात पुरुषांबरोबरच स्त्रियांनीही मोठा सहभाग घेतला होता. आणि अशा स्त्रियांचे योगदान दुर्लक्षित राहू नये तरुण पिढीला सुद्धा कळावे की आपल्या भारत देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात पुरुषांनीच नव्हे तर स्त्रियांनी सुद्धा मोलाचे योगदान दिलेले आहे.मात्र स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्त्रियांच्या या कामगिरीची म्हणावी तशी दखल घेण्यात आली नव्हती मात्र काही इतिहासकारांनी दखल घेऊन त्यांचे योगदान वेगवेगळ्या विषयांवर अधोरेखित केले. त्यात राष्ट्रीय चळवळीत सहभागी असलेल्या स्त्रियांचे योगदान, महात्मा गांधींसोबतच्या चळवळीतील सहभागी स्त्रियांचे योगदान, अल्पसंख्यांक तसेच परदेशी स्त्रियांची योगदान, असे विविध शीर्षकाखाली इतिहासकारांनी स्त्रियांचे योगदान अधोरेखित केले आहे.

या चळवळीत सक्रिय असलेल्या पुरुषांच्या कुटुंबाचेही योगदान आणि त्यांनी सहन केलेल्या हाल अपेष्टाही दुर्लक्षित करून चालणार नाही. येसूबाई सावरकरांचे येथे चळवळ सहभागी न होता केलेले योगदान ,अरुणा असफली, कॅप्टन लक्ष्मी सहगल यांची कामगिरी कौतुकास्पद आहेच मात्र चाफेकर बंधूंना फाशी झाल्यानंतर त्यांच्या बायकांचे झालेले हाल आणि त्यांच्या वेदना जीवाला चटका लावून जातात.

महात्मा गांधींच्या प्रेरणेने स्त्रिया ह्यात उतरल्या. त्यासाठी अनेकविध उपाय अमलात आणले गेले ज्यात सुतकताई सत्याग्रह, असहकार, इंग्रजांना विरोध, विदेशी मालावर बहिष्कार असे विविध उपयोजिले गेले.त्यात मणिबेन नानावटी, कमलाबेन पटेल, अवंतिकाबाई गोखले, मृदुला साराभाई, मनीबेन कारा अशा अनेक स्त्रिया,तसेच पेरिन कॅप्टन आणि तय्यबजी कुटुंबातील मिठूबेन पेटीट, खिलाफत चळवळीतील स्त्रिया, दलित स्त्रिया, मीराबेन, भगिनी निवेदिता, दक्षिण आफ्रिका आणि गोवा मुक्ती आंदोलनातील सहभागी स्त्रिया, तसेच एनी बेझंट सारख्या मूळच्या परदेशी स्त्रिया ही आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. अशाच काही स्त्रियांबद्दल आपण जाणून घेऊया.

१) <u>भिकाजी कामा</u>: भिकाजी कामा या सधन पारशी कुटुंबातून आलेल्या स्त्रीने, समाजात स्त्री पुरुष समानतेसाठी चळवळ सुरू केली होती.बदाम कामा यांनी आपली सर्व संपत्ती त्यासाठी देऊ केली होती.

२) <u>बेगम हजरत महल</u>: अवधच्या बेगम हजरत महल यांनी, राणी लक्ष्मीबाई यांचा लढा पुढे चालू ठेवत ब्रिटिशांनी मंदिर मस्जिद उध्वस्त करण्याच्या धोरणा विरोधात आवाज उठवीत आपले बलिदान दिले.

३)<u>कित्तूर राणी चन्नम्मा</u>: कर्नाटकामधील कित्तूरची राणी चन्नम्मा यांनी ब्रिटिशांविरुद्ध आवाज उठविला.आणि वयाच्या ३३व्या वर्षी त्यांनी सैन्याचे समर्थपणे नेतृत्व करीत ब्रिटिशांविरोधात शौर्याने लढा दिला.

४) <u>कमलादेवी चट्टोपाध्याय</u>: ह्या समाज सुधारक होत्या. भारताचा स्वातंत्र्यलढा सुरू असताना यांनी समाज सुधारणेच्या चळवळीची कामे सुरू केली. सोबतच महात्मा गांधीजी सोबतच्या मिठाच्या सत्याग्रहातही त्या सामील झाल्या. ब्रिटिशांनी अटक केलेल्या त्या पहिल्या महिला होत्या.

५) <u>कॅप्टन लक्ष्मी सहगल</u>: नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी स्थापन केलेल्या, आझाद हिंद सेनेतील महिलांच्या तुकडीचे नेतृत्व समर्थपणे करून, त्यांनी दाखवून दिले की कोणतेही युद्ध करायची वेळ जरी आली तरी स्त्रिया कशातच मागे नाहीत.

६) <u>अरूणा असफ अली</u>: "द ग्रँड लेडी"म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अरूणा असफली यांनी मुंबई आंदोलनात भारताचा ध्वज हातात घेऊन नेतृत्व केले होते. असे करत असताना त्यांना तुरूंगात डांबण्यात आले होते. तिथे कैद्यांना दिल्या जाणाऱ्या अत्यंत वाईट वागणुकी विरूद्ध ही तुरूंगात त्यांनी आंदोलन केले होते.

७) <u>कनकलता बरूवा</u>: आसाम मधून १९४२च्या आंदोलनात ब्रिटिशांविरूद्धच्या भारत छोडो च्या घोषणा देत गोहपूर येथील पोलीस स्टेशन समोर आंदोलन करीत तिरंगा फडकवायचा होता. मात्र ब्रिटिशांनी त्यांचे आंदोलन हिंसक आहे असे समजून त्यांच्यावर लाठी चार्ज केला आणि त्यातच वयाच्या अठराव्या वर्षी त्यांना आपल्या प्राणांचे बलिदान द्यावे लागले.

८) <u>मातंगिनी हाजरा</u>:  मातंगिनी हाजरा या "गांधी बुरी" म्हणूनही ओळखल्या जातात कलकत्त्यातील एका चळवळीत तिरंगा ध्वज हाती घेऊन वंदे मातरम च्या घोषणा करीत असताना ब्रिटिशांनी केलेल्या गोळीबारात त्यांना तीन गोळ्या वर्मी लागूनही त्यांनी हातातील तिरंगा मात्र खाली पडू दिला नाही, आणि तिथेच त्यांचा मृत्यू झाला. कलकत्त्यातील त्या ठिकाणालाआता हाजरा रोड म्हणून ओळखल्या जाते.

९) <u>तारारानी श्रीवास्तव</u>: तारारानी आणि फुलेंदू बाबू दोन्ही उभयतांनी भारत छोडो आंदोलनात सहभाग घेतला होता. सिवान च्या पोलीस स्टेशनवर भारतीय तिरंगा लावायला हे सर्व आंदोलन कर्ते आले होते आणि पोलिसांनी त्यांच्यावर केलेल्या गोळीबारात फुलेंदू बाबू यांचा अंत झाला मात्र तारारानी अडीग राहून पुढे भारत स्वतंत्र होईपर्यंत लढत राहिल्या.

१०) <u>मूलमती</u>: मूलमती ह्या काकोरी कटात सहभागी असलेल्या रामप्रसाद बिस्मिल यांची आई रामप्रसाद यांना फाशीची शिक्षा झाल्यानंतर त्यांनी आपल्या दुसऱ्या मुलासहित देशासाठी अर्पण केले. आपल्या पोटच्या गोळ्यांना देशाच्या स्वातंत्र्यतेसाठी  अर्पण करणाऱ्या अशा मातेला शतशः नमन.

११) <u>सुचेता कृपलानी</u>: सुचेता कृपलानी ह्या गांधीवादी विचारसरणीच्या स्वातंत्र्यसेनानी होत्या. यांचा सुद्धा स्वातंत्र्य चळवळीत प्रत्यक्ष सहभाग होता.

१२) <u>सरोजिनी नायडू</u>: सरोजिनी नायडू हे नाव आपल्याला चीर परिचित आहे. त्यांनी त्या काळात अनेक देशभक्तीपर गीते लिहिली, ज्यामुळे प्रेरणा आणि जोश निर्माण झाला. त्या गांधीजींच्या प्रत्येक आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

१३) <u>ऍनी बेझंट</u>: ऍनी बेझंट ह्या भारतीय नसून आयरिश महिला होत्या. मात्र असे असून देखील त्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळावं यासाठी होमरूलची चळवळ सुरू केली. तसेच त्यांनी त्या काळात अनेक शाळा कॉलेजेस सुरू करण्यासाठी मदत केली.

१४) <u>उषा मेहता</u>: स्वातंत्र्य लढ्यातील महत्त्वाचे योगदान उषा मेहता यांचे आहे.भूमिगत राहून त्यांनी रेडिओ स्टेशन चालू करून. त्यांनी लढ्यात कोण सहभागी आहे, कुठे अन्याय होत आहे,अशा बातम्या द्यायला सुरुवात केली. यामुळे आंदोलन कर्त्यांना माहिती मिळून पुढे जाण्यास सुकर झाले.

अशा या चौदा रणरागिणी ज्यांनी स्वातंत्र्यलढ्यात आपले महत्त्वाचे योगदान दिले. यातील काही चीर परिचित नावे आपण इतिहासात ऐकून वाचून आहोत. कस्तुरबा गांधी, कमला नेहरू, विजयालक्ष्मी पंडित ही नावं चीर परिचित आहेत. त्यांनी सुद्धा प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे लढ्यात सहभाग घेतला. अशा सर्व स्त्रियांचे योगदान स्वातंत्र्यलढ्यात किती महत्त्वाचे होते हे आपल्याला कळून येते. अशा स्त्रियांचे योगदान काळाच्या पडद्याआड जाऊ नये म्हणून हा लिखाणाचा खटाटोप प्रत्येकीने किंवा प्रत्येक व्यक्तीने करायलाच हवा.येणाऱ्या तरुण पिढीला यामुळे मार्गदर्शन मिळेल स्वातंत्र्य!!!

लढ्यातील अशा सर्व रणरागिणींना माझा शतशः प्रणाम !!! वंदे मातरम ! वंदे मातरम ! वंदे मातरम !

# 'ती'चा संग्राम

- पल्लवी चिकारे-पळसकर

*जयोस्तुते श्रीमहन्मंगले शिवास्पदे शुभदे*

*स्वतंत्रते भगवती त्वामहं यशोयुतां वंदे*

हे स्त्री....

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात

योगदान देतानाही तू मागे हटली नाहीस.

थकली नाहीस की, हरली नाहीस.

पुरुषांच्या खांद्याला खांदा जुळवून लढताना

स्वातंत्र्यलढ्यातही बलिदान दिलेस

ज्या धीराने तू कुटुंब सांभाळलं

त्याच हिमतीने तू तलवार हातात घेऊन लढली सुद्धा.

चुलीतल्या जाळाप्रमाणे तुझ्याही आत एक आग धगधगत होती.

ब्रिटिशांना हाकून लावण्याची तीव्र आग तुझ्या मनातही पेटत होती.

कधी तिरंगा घेऊन लढलीस कधी लाठीचे सोसले घाव

धारातीर्थी पडतानाही तिरंग्यासाठी घेतलीस धाव

वर्मी लागणाऱ्या गोळ्या हसत हसत झेलतानाही

तुझा निश्चय मात्र डगमगला नाही

तुझ्या निश्चयाचा महामेरू किंचितही ढळला नाही.

हे स्त्री....

कधी तू झालीस चंडिका, कधी झालीस दुर्गा

कधी सरस्वती होऊन गीते लिहिलीस तर कधी हातात तलवार घेऊन रणरागिणी झालीस

अशा तुझ्यातील जागृत प्रत्येक रूपाला माझे शतशः नमन शतशः नमन

कांटो की राह चली तू
पर दी हमें फूल की छाया।
हम तो महफूज रहे हैं
तेरी छलनी हो गई काया।

# 'बा स्वातंत्र्या'

- वर्षा पतके - थोटे

बा स्वातंत्र्या तू पंच्याहत्तर वर्षाचा झालास. आता तुला छ्याहत्तरावं वर्ष लागलंय. एका आज्ञाधारक मुलाने, मुलीने आपल्या बापाचा 'अमृत महोत्सव' साजरा करावा तसा आम्ही लेकरांनीही तुझा 'अमृत महोत्सव' धुमधडाक्यात साजरा केला. पण मग '१५ ऑगस्ट'  किंवा '२६ जानेवारी' हे दोन दिवस सोडले तर बाकी दिवसाचं काय ? आमच्या लक्षातही राहत नाही आमचाच बाप  परकीयांच्या कैदेतून सोडवताना आमच्या स्वकीयांना किती झुंजावे लागले, किती लढावे लागले. जीवन राष्ट्राला समर्पित करताना त्यांना स्वतःचं सुख विसरावे लागले. स्वतःच्या घरात राहताना दहशतीत, पारतंत्र्यात राहावे लागले. घरावर तुळशीपत्र ठेऊन त्यांनी आपलं तन, मन , धन राष्ट्र मुक्त करण्यासाठी समर्पित केले. पण आम्ही सहजपणे उपलब्ध असलेल्या या स्वातंत्र्याचा खरंच सन्मान करतो आहोत का ? किंवा ते जपून कसं ठेवावं ? किंवा स्वातंत्र्य म्हणजे नेमकं काय ? हे आजच्या पिढीला समजावण्याची वेळ आली आहे का ? असे अनेक प्रश्न मनात खरंच उत्पन्न व्हायला लागलेत हे नक्की.

एखाद्या राष्ट्राला स्वतंत्र होऊन पंच्याहत्तर वर्षे होणे म्हणजे फार काही मोठा काळ नाही. पण व्यक्तिपरत्वे हा काळ फार मोठा आहे. ज्यांनी पारतंत्र्य भोगलंय मग ते कोणत्याही प्रकारचे असो त्यांच्यासाठी हा काळ फार मोठा ठरतो आणि तोच व्यक्ती स्वातंत्र्याची किंमतही जाणतो.

इतिहासाची पाने पालटली तर आपणाला कळून येते की, विवेकानंदांचा विवेक जसा तरूणपणात जागा झाला. तसा विवेक आजच्या तरूणांमध्ये जागा झालाय का ? विवेकानंदानी त्यांचा विवेक, त्यांचे वैराग्य, त्यांची विचारशीलता यांनी भारतीय संस्कृतीच्या विजयाची नवी गाथा लिहून काढली. भारतीय इतिहासाचा नवा अध्याय लिहून काढला. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यानंतर अनेक तरूण क्रांतिकारक देशभक्तांनी देशाच्या उत्थानाची, देशाच्या कल्याणाची पराक्रम गाथा लिहून काढली. लोकमान्य टिळकांनी तरूण असतांनाच " स्वराज्य हा माझा

जन्मसिद्ध" हक्क आहे आणि तो मी मिळविणारंच " याचा मोठ्याने उद्घोष केला. सुभाषचंद्र बोस, भगतसिंह, चंद्रशेखर आझाद हे सर्व तरूण असतांनाच त्यांनी आपले प्राण पणाला लावले व देशासाठी स्वतःच्या प्राणांची आहुती दिली. त्याच बरोबर या सर्वांनी तरूण चेतनेला, तारुण्य शक्तीला आपल्या स्वतःच्या जीवनाचे उदाहरण पुढे ठेवून नवा अर्थ दिला. त्यांनी दाखवून दिले की तारूण्य हे केवळ भावनेच्या वादळात भरकटत राहण्यात, त्यात गटांगळ्या खाण्यात व त्यातच त्याला समाप्त करून घेण्यात स्वास्थ्य नाही. तारूण्य हे धन, बळ, पद, प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी मिळालेले नाही. तारूण्याचे सार्थक देश, धर्म, समाज, संस्कृती याच्या कामी येण्याचं आहे. यांच्या विरूद्ध शंखनाद करून त्यासाठी जिवापाड संघर्ष करणे हे केवळ तरूणांचेच दायित्व आहे. हे त्यांनी जाणले होते. पण आम्ही काय करतो आहोत ? तर फक्त आणि फक्त स्वत: ची प्रतिष्ठा, पद, धन सांभाळण्याचे काम करतो आहोत. देशाप्रती आपलीही काही कर्तव्य आहेत. हे मात्र आजच्या तरूणांच्या मनातही येत नाही.

आज देश भ्रष्टाचार, अनाचार, अत्याचार व शोषण करण्यात फसलेला आहे. सर्व सामान्य जनतेची चेतना अजून झोपलेली आहे, सुस्तावलेली आहे, आळसावलेली आहे व पूर्णपणे नामानिराळी झालेली आहे. त्या चेतनेला हलवून, डोलवून, गदागदा हलवून जागे करण्यासाठी मोठ्या ऊर्जेची वावटळ उठायला हवी. देश या सर्व वाईट गोष्टींपासून मुक्त करण्यासाठी तरूणांच्या पिढीने पुढे येणे आवश्यक आहे. पण आजचा तरूण या गोष्टींकडे डोळेझाक करतो आहे. या सगळ्या वाईट गोष्टींकडे पाहायला त्याला वेळ नाही. त्याचे शिक्षण, त्याचे कॅरीअर, त्याचे पद,यातच त्याची ऊर्जा खर्च होते आहे.

बा स्वातंत्र्या आजही आव्हाने अनेक आहेत. पण समाधान मात्र नाही. तरूणांचे जागरण, त्यांची सक्रियता, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांचे सहकार्य, भागीदारी, साहसपूर्वक जबाबदारीची जाणीव व ती पेलण्याची तत्परता, मोठे साहस, दृढसंकल्प, धैर्य यांच्या सह विचारप्रवण व भावनाशील युवक जर पुढे आले व त्यांनी आपली पावले उचलली तर असंभव वाटणा-या समस्यांचे देखील समाधान गवसणे शक्य होईल. पण आजच्या परिस्थितीला काय म्हणावे? हा मोह आहे की असंजसपणा आहे की संभ्रम आहे की मनात केवळ निराशा व उपेक्षाच भरलेली आहे ? जे व्हायला हवे आहे, ते होत नाही. वेगवेगळ्या विषयांवर चर्चा होते,

सविस्तर विचार विनिमय होतो, वर्तमान पत्रात, टीव्हीवर, वेगवेगळ्या चॅनेल्सवर लांबलचक वादविवाद होत राहतात. पण जेव्हा त्याच्या अनुषंगाने प्रत्यक्षात काही करण्याची वेळ येते तेव्हा सगळेजण आपली पावले मागे घेऊ लागतात. कुठे काही कुणी करायला सुरूवात जरी केली तरी त्यातही एकमेकांची निंदा करून वास्तविक अवास्तविक गोष्टींना उचलून धरून इतरांवर मनसोक्त तोंडसुख घेऊन आपले कर्तव्य पार पाडल्याचे, कर्तव्य पूर्तीचे समाधान मानून घेतात. जणू काही दुस-यांची तोंड भरून निंदा करण्याशिवाय दुसरे सामाजिक कर्तव्य शिल्लकच राहिले नाही अशी धारणा बाळगून आत्मसंतुष्टीत निमग्न होऊन जातात.

बा स्वातंत्र्या तुझ्या उपस्थितीत ही जेव्हा उरी- पुलवामा सारख्या घटना घडतात. तेव्हा मन बेचैन होऊन उठतं. काश्मिर मध्ये ज्या हत्या होतात तेव्हा मन घाबरून उठतं. भ्रष्टाचाराचा भस्मासुर जेव्हा जागोजागी दिसतो आहे तेव्हा मन काहीही करायला धजावत नाही आणि ' सत्यमेव जयते ' या वाक्याचा अर्थ कळेनासा होतो. अत्याचार दिसला की भयंकर भिंती वाटते. या सर्व वाईट गोष्टींपासून तू कधी मुक्त होणार आहेस बा स्वातंत्र्या? आता ही लढाई कोण्या परकीयांशी नाही तर आपलीच आपल्याशी आहे. तुझ्याच मुलांमध्ये हा बोकाळलेला वाईट रोग आहे. हा संपवणं फार गरजेचं आहे बा स्वातंत्र्या तेव्हाच खऱ्या अर्थाने तुझं अस्तित्व अबाधित राहील. नाहीतर पुन्हा परकीय लोक तुला पारतंत्र्यात टाकतील आणि यावेळी तू कोणाकडून आशा ठेवशील स्वतंत्र होण्याची बा स्वातंत्र्या. आता असं कर जी काही तुझ्या हयातीत देशाची प्रगती झाली आहे. ती पुरेशी नाही. मला आणखी स्वतंत्र भारताची प्रगती हवी आहे हे तू तुझ्या लेकरांना एक बाप म्हणून निक्षून सांग बा स्वातंत्र्या तरच तू ख-या अर्थाने स्वतंत्र होशील आणि चिरंजीव होशील...

चिरंजीव होशील ना 'बा स्वातंत्र्या' ?

# भारतीय स्वातंत्र्य चिरायू रहो!!

- डॉ. सोनाली गायकवाड

पारतंत्र्याची शृंखला उधळीत भारत देश वारंवार स्वतंत्र होत राहिला. देशवासियांचा स्वाभिमान जागृत करीत अनेक लढवय्ये देश रक्षणार्थ कामी पडले. अनेक शत्रू भारताला लुटायला अनेक वेळा स्वाऱ्या करीत राहीले. व्यवसाय करायला म्हणून आलेल्या अनेक परकीय सत्ता येथे वसाहती करून बसल्या. त्यात डच, पोर्तुगाल, फ्रेंच, ग्रीक, ब्रिटिश अशा अनेक परकीय सत्ता होत्या. भारतीयांचा वेळ आणि शक्ती ह्या सत्ताशी लढण्यात कायम खर्ची पडली. एक एक करून एकेकाला बाहेर काढण्यात आम्ही यशस्वी झालो खरे, पण ब्रिटिशांनी जाता जाता डाव साधला. भारत एकोणीसशे सत्तेचाळीस मध्ये स्वतंत्र तर झाला पण ह्या स्वातंत्र्याला फाळणीचा शाप होता.धर्म भेदाची आग ब्रिटिशांनी येथील जनतेत लावली व ती कशी फोफावेल ह्याकडे लक्षही दिले. परकीय शत्रू भारताला घरातच शत्रू देऊन गेला. शेजारीच शत्रू देऊन गेला. भारताच्या शेजारी राष्ट्रामध्ये एक शत्रू निर्माण करून गेला. चीनला सोबत म्हणून पाकिस्तान देऊन गेला.

म्हणायला दोन्ही शेजारी राष्ट्र पण दोन्ही कायम भारताच्या उण्यावर. स्वातंत्र्यावर डोळा ठेवून बसलेली गिधाडं. लक्तर काढायला कायम तयार.

स्वतंत्र, गणराज्य भारतासमोर असलेला यक्ष प्रश्न. ब्रिटिशांविरुद्ध एकोणीसशे सत्तेचाळीसच्या स्वातंत्र्य समरानंतर आज पंच्याहत्तर वर्षानंतर हे स्वातंत्र्य अबाधित राखून अमृत महोत्सवी वर्षापर्यंत पोहचविण्यास तो एकोणीसशे सत्तेचाळीसच्या स्वातंत्र्य समर पुरेसा नव्हता. मिळालेले स्वातंत्र्य टीकावे म्हणून अनेक वेळा शेजारी राष्ट्रांशी  दोन हात करावे लागले. घुसखोऱ्या हाणून पाडाव्या लागल्या. त्या सगळ्याचा थोडक्यात आढावा घ्यायचा झाल्यास, सगळ्यात पहिलं युद्ध लगेच वीस ऑगस्टला सुरु झालं, जेव्हा पाकिस्तान सरकार व तेथील लष्कराचे सहकार्य असलेल्या टोळ्यांनी ऑपेरेशन गुलमर्ग नावाने काश्मीरवर हल्ला केला. त्यावेळी काश्मीर चा राजा भारतात सहभागी झाला व भारतीय सैन्याने पाकिस्तानी हल्ल्याला चोख उत्तर दिले. त्या दरम्यान जम्मू पासून पुंच्छ

उरी बडगाम तसेच कारगिल लेह लडाख या भागात लढाया सुरु होत्या. अखेरीस तेरा ऑगस्ट एकोणीसशे अठ्ठेचाळीसला तत्कालीन संयुक्त राष्टसंघाने युद्ध विरामची घोषणा केली. त्यावेळी पाकिस्तानाच्या ताब्यात राहिलेला भाग व उर्वरित जम्मू काश्मीर दरम्यान नियंत्रण रेषेचा जन्म झाला.

त्यानंतर एकोणवीसशे त्रेसष्ठ साली दुसरा शत्रू चीनशी दोन हात करावे लागले. ह्या युद्धात भारताचा बराचसा भाग चीनने गिळंकृत केला. या आधी दलाईलामा ना भारताने आश्रय दिला म्हणून चीन भारताच्या विरोधात होताच. त्याआधीही चीनने भारताचे काही सैन्य मारले होतेच. भारतीय बुद्धीवाद्यानी तेव्हा तत्कालीन पंतप्रधान नेहरूंना ठोस भूमिका घ्या असा सल्ला दिला होता, पण त्यावेळी नेहरूंना संघर्षाची तीव्रता कमी करून चीनबरोबर मैत्रीपूर्ण संबंध कायम ठेवणे योग्य वाटले. त्यानंतर एकोणवीसशे बासष्ट मध्ये चीनने अनेक भारतीय ठाणी जिंकून घेतली, त्यावेळी धक्का बसलेल्या भारतीय लष्करी अधिकाऱ्यांनी तिथून माघार घेतली व चीनी सैनिकांना एक प्रकारे भारताचे दरवाजे खुले करून दिले. पुढे नऊ नोव्हेंबरला जेव्हा नेहरूंनी अमेरिका व ब्रिटनला मदतीचा हात मागितला तेव्हा पाश्चिमात्य गटांशी संभाव्य संघर्ष टाळण्यासाठी चिनने माघार घेतली. इतके वर्ष झाली पण अजूनही चीन बरोबर चकमकी सुरूच असतात.

ह्या धक्यातून भारत सावरतो न सावरतो तोच पासष्ट साली पाकिस्तान पुन्हा काश्मीर मिळविण्याच्या मनसुब्याने हल्ला करून आला. हा हल्ला जरी अयशस्वी झाला तरी पुन्हा सप्टेंबर मध्ये पाकिस्तानने पलट वार केल्याने युद्धाला सुरुवात झाली. ह्यात मोठी जीवित हानी झाली आणि मिळालेला प्रदेश दोन्ही देशांनी एकमेकांना परत केला. त्यामुळे युद्धाचा ठोस असा निर्णय लागलाच नाही. पण जागतिक महायुद्ध वगळता दोन देशांमध्ये झालेले हे पहिले हवाई युद्ध होते.

ह्यांनंतर एकोणवीसशे ऐकाहत्तर मध्ये भारत पाकिस्तान ह्यांच्यात युद्ध झाले जागतिक महायुद्ध वगळल्यास या युद्धात पहिल्यांदाच दोन्ही देशांची तिन्ही दले सहभागी झाली होती. एकाच वेळी उत्तर (जम्मू काश्मीर ), पश्चिम(कच्छ ते

पंजाब ), पूर्व आघाडी (सध्याचा बंगाल )आणि समुद्र ह्या चार ठिकाणी भारतीय लष्कराने पाकिस्तानी सैन्याला तोंड दिले. तेरा दिवस होणाऱ्या ह्या युद्धात पाकिस्तानातून बांगलादेश वेगळा झाला. राजकीय दृष्ट्या हा भारताचा मोठा विजय ठरला.

त्यानंतर एकोणवीसशे नव्याणनऊ मधील कारगिल हे बहुचर्चित युद्ध भारत पाक दरम्यान झाले. हे युद्ध कारगिल, द्रास बटालिक या लडाख क्षेत्रापर्यंत मर्यादित होते पंधरा हजार ते एकोणवीस हजार फूट उंचीवर लढले गेलेले हे जगातील एकमेव युद्ध होते. सैनिकांनी तेथील वातावरणात स्वतःला सामावून घेऊन हे युद्ध लढले व जिंकले देखील. दोन महिने सुरु असलेले हे युद्ध अमेरिकेच्या मध्यस्थीने संपुष्टात आले. पाकिस्तान भारताची झालेली ही चार युद्धे आणि चीन सोबत चे युद्ध हे शेजाऱ्यांच्या कारवायांची उदाहरणे आहेत. ह्या प्रत्यक्ष युद्धाशिवाय दोन्ही शेजारी राष्टांकडून सीमारेषा ओलांडण्याचा आहेर भारताला अधून मधून मिळतच असतो. त्यांना सामोरे जायला भारतीय सेना तयारच असते.

आणि मग कधीतरी “सौ सुनार की एक लुहार की” सांगायला भारताला एखादा सर्जिकल स्ट्राईक करावा लागतो. सप्टेंबर दोन हजार एकोणवीस मध्ये तो केल्या गेला. ती फार कठीण गोष्ट असते, कारण शत्रूच्या गोटात शिरून त्याला निस्तनाबुत  करण्याचा बेत असतो. त्यात आपलेही फार नुकसान होऊ शकते, पण म्यानमार  आणि उरी ह्या दोन्ही ठिकाणी भारतीय सेनेने हे काम यशस्वीरित्या केले.

स्वतंत्र प्राप्ती नंतर ते अबाधित ठेवणे हे काम सीमेवर सैनिक करत असतात. रात्रीचा दिवस करून लढाया लढल्या जातात. ह्या सगळ्या घटनांची  उजळणी करून त्या सगळ्या रक्षकांना ही छोटीशी मानवंदना.

आपण प्रत्यक्ष लढायला जरी गेलो नाही, तरी त्यांच्या कामगिरीची जाणीव ठेवणे व अप्रत्यक्ष रित्या त्यांच्या सोबत राहणे आपले कर्तव्य आहे. आम्हाला अभिमान आहे आमच्या देशाचा आणि देशरक्षणार्थ प्राणपणाने लढणाऱ्या सगळ्या लढवैयांचा.

भारत माता की जय!

# स्वातंत्र्य चळवळीतील धगधगती मशाल- प्रितीलता वड्डेदार!

- स्नेहा दिनेश जोशी

भारतीय स्वातंत्र्याला नुकतीचं ७५ वर्षे पुर्ण झाली. इंग्रजांच्या गुलामगिरीतुन मुक्त होत, १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. हे स्वातंत्र्य मिळाले खरे, पण  केवळ आंदोलने, चळवळी,सत्याग्रहाने हे स्वातंत्र्य आपल्याला मिळाले का? तर नक्कीचं नाही. कित्येक प्राणांच्या आहुत्या पडल्या, तेव्हा कुठं हा स्वातंत्र्याचा यज्ञकुंड धडधडु लागला. अनेकांनी आपलं आयुष्य, घरदार ओवाळुन टाकलं. यात सगळेचं लोकं होते, मग स्त्रिया तरी मागे कशा राहतील? पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनीही स्वातंत्र्य संग्रामात मोलाची भुमिका बजावली. मादाम कामा, सरोजिनी नायडु, आझाद हिंद सेनेच्या विजयालक्ष्मी पंडीत, रमाबाई रानडे, यमुनाबाई सावरकर, गोदावरी सावरकर, सावित्रीबाई फुले, या महिलांनी इंग्रजांविरुद्धच्या लढ्यात पुरुषांना तोलामोलाची साथ दिली. यांपैकीचं एक होत्या बंगाल प्रांतांच्या प्रितीलता वड्डेदार!

शाळेत असताना इतिहासाच्या पुस्तकामधला एका धड्यातला छोटासा परिच्छेद, इतकंचं त्यांचं महत्त्व आम्हांला माहित होतं. पण इंग्रजांना सळो कि पळो करुन सोडणार्या प्रितीलता प्रत्यक्षात धगधगती मशाल होत्या.जाज्वल्ल्य देशप्रेमाने भारलेल्या प्रितीलता म्हणजे दुसर्या झाशीच्या राणीचं. भारतीय उपखंडातील एक बंगाली क्रांतिकारी म्हणुन प्रितीलता ओळखल्या जातात. वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षापासुन देशप्रेमाचं बीज प्रितीलताच्या मनात रुजलं गेलं. त्यांचा जन्म एका गरीब घरात झाला. त्यांचे वडिल नगरपालिकेत नोकरीला होते. त्यांचं शालेय शिक्षण चटगांव आणि ढाका(आताचं बांग्लादेश) इथे झालं. त्यानंतर कलकत्यातील बेथ्युज महाविद्यालयातुन त्यांनी तत्त्वज्ञानाची पदवी घेतली आणि घराला हातभार म्हणुन चटगांव येथील एका शाळेतचं शिक्षिकेची नोकरी पत्करली.

प्रितीलता शालेय जीवनातचं बालचर संस्थेची सदस्य झाली. तिथे त्यांनी सेवा आणि शिस्तीचे धडे गिरवले. या संस्थेत असतानाचं, संस्थेच्या सदस्यांना ब्रिटीश सम्राटाशी निष्ठेची शपथ घ्यावी लागत असे, हि गोष्ट प्रितीलताला मनोमन

खुप दुःखी करत असे, अस्वस्थ करत असे. क्रांतीचे हे बीज तेव्हापासुन त्यांच्या मनात खोलवर रुजले गेले ते कायमचेचं. पुढे प्रितीलता सुर्यसेन यांच्या नेतृत्वाखाली एका क्रांतिकारी गटात सामिल झाल्या. शाळेत शिक्षिकेची नोकरी करत असतानाचं त्या सुर्यसेन बाबुंच्या संपर्कात आल्या. त्यानंतर त्या त्यांच्या अनेक चळवळीत सक्रिय सदस्य बनल्या. मास्टरजी सुर्य सेन यांच्या कार्याने प्रभावित होऊन त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देण्याची तयारी सुरु केली. गुप्तपणे क्रांतिकारी चळवळीशी संबंधित साहित्य गोळा करुन, त्याचा अभ्यास करायला सुरुवात केली.

कलकत्त्यात असताना, अलिपुर तुरुंगात बंदीवान असलेल्या स्वातंत्र्यसैनिक रामकृष्ण विश्वास यांच्याशी तिची अनेक वेळा भेट होत असे. त्यांच्या अनुभवांनी, मार्गदर्शनाने, चर्चेने प्रितीलताला सशस्त्र चळवळीसाठी प्रेरित केले. यांचदरम्यान प्रितीलता कलकत्त्यांहुन गुप्तपणे चटगांव क्रांतिकारकांना शस्त्रे पुरवु लागली. पुढे तिला शाळेत नोकरीही चटगांवमध्येचं लागल्याने सशस्त्र चळवळीत सहभागी होण्याचे तिचे स्वप्न आकार घेऊ लागले. मास्टर सुर्यसेनांना जेव्हां प्रितीलताचे देशासाठीचे समर्पण लक्षात आले, तेव्हा त्यांनी तिला आपल्या संघात समाविष्ट केले. प्रितीलताच्या नेतृत्वाखाली क्रांतिकारकांनी ब्रिटीशांवर अनेक हल्ले केले आणि यशही मिळवले.

चटगांव मध्ये पहाटोला या ठिकाणी एक युरोपियन क्लब होता, जिथे ब्रिटीश अधिकारी मनोरंजनासाठी जात असत. या क्लबच्या बाहेर दारावर स्पष्टपणे एक सुचना वजा आदेशाची पाटी होती. ज्यावर लिहिलेले होते, "कुत्रे आणि भारतीयांना प्रवेश नाही!" हि नोटीस भारतीयांची मने दुखावणारीचं होती. सुर्यसेनांनी या क्लबवरचं हल्ला करण्याची योजना आखली. २३ सप्टेंबर १९३२च्या दिवशी या क्लबवर हल्ला करण्याचे ठरले. हि योजना पार पाडण्यासाठी सुर्यसेनदांनी प्रितीलताची निवड केली. त्यांच्यासोबत आठ पुरुष सहकारी देण्यात आले, ज्यांना शस्त्रे वापरण्याचे प्रशिक्षण देण्यात आले होते. वंदे मातरम् म्हणुन सर्वांनी सुर्यसेनदांचा निरोप घेतला आणि रात्री १०.४५ वाजता च्या सुमारास प्रितीलता

आणि त्यांचे सहकारी युरोपियन क्लबमध्ये पोहोचले.

अनेक ब्रिटीश अधिकारी त्यावेळी त्या क्लबमध्ये उपस्थित होते. प्रितीलता आणि त्यांच्या सहकार्यांनी या क्लबवर सशस्त्र हल्ला चढवला. या हल्ल्यात एक जण ठार तर ११ जण गंभीर जखमी झाले. त्यानंतर क्रांतिकारकांनी युरोपियन क्लब जाळला. या हल्ल्यानंतर खवळलेल्या इंग्रजांनी या क्रांतिकारकांना पकडले. अटक झाल्यानंतर इंग्रजांकडुन होणार्या छळाची कल्पना प्रितीलताला होती तसेच इतर सहकार्यांची माहितीही इंग्रज आपल्याकडुन काढुन घेणार, हेही प्रितीलताला ठाऊक होते. त्यामुळे अटक होण्यापुर्वीचं प्रितीलताने आपल्या जवळील सायनाईडचे सेवन करुन मृत्युला जवळ केले.

स्वातंत्र्यसंग्रामात अशा अनेक प्राणांच्या आहुत्या पडल्या तेव्हा कुठे स्वतंत्र भारताचा सुर्य अधिक तेजाने तळपु लागला. अनेक अलिखित घटनांमधली ही घटनाही बहुसंख्य लोकांपर्यंत पोहोचु शकली नाहीचं. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात प्रितीलता मात्र अजरामर झाली. पुरुषांच्या बरोबरीने, तितक्याचं ताकदीने तिने आपले देशप्रेमाचे कार्य केले. या वीरांगणेला शतशः प्रणाम_!!!

"अगणित तेजाळली तारांगणे,

स्वतंत्र भारताच्या नभी_

तरी मशाल होऊनी धगधगली,

एक ज्वाला वेगळी_!!"


बर्मिंगहम कॉमनवेल्थ गेम्स
२०२२ मध्ये भारतीय संघाचे
घवघवीत यश